N WORD NO 1528
Date 31/7/05
NSUP DARWHA

**शैक्षणिक वर्ष २००५-०६ पासून तंत्रशिक्षण संचालनालयाअंतर्गत कार्यरत विविध तंत्रनिकेतनातील/ तंत्रसंस्थांतील अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अखत्यारितील पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेशक्षमतेत बदल व नवीन अभ्यासक्रमांना मान्यता व सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमांना मुदतवाढ देण्याबाबत . . .**

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक :- मान्यता-२००५/(७५८/०५- भाग अ)/तांशि-६
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २२ ऑगस्ट, २००५.

संदर्भ :- १. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र.३३८२/११८३६/(१९०)/तांशि ३ १अ, दिनांक २१ मे, १९८३.
२. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र मान्यता २००५/(६३९/०५)/तांशि-६, दि. १५ मार्च, २००५.
३. तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. २/एनजीसी/पदविका प्रस्ताव/२००५/४१६, दि.२४/५/२००५.
४. महाराष्ट्र राज्य, तंत्रशिक्षण मंडळ अधिनियम, १९९७
५. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांचे पत्र क्र.एमएसबीटीई/डी-५३/ फुलटाइम कोर्सेस/एनओसी/२००५-०६/३४००, दि.१२ मे,२००५
६. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांचे पत्र क्र.एमएसबीटीई/डी-५३/ फुलटाइम कोर्सेस/एनओसी/२००५-०६/३९७१, दि.३ जून,२००५

**शासन निर्णय :-** सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारितील पदविका अभ्यासक्रम (अभियांत्रिकी/ एचएमसीटी/फार्मसी इत्यादी.) राबविणा-या संस्थेतील प्रवेशक्षमतेत बदल, नवीन अभ्यासक्रमांना मान्यता व सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमांना मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार यासाठी उपरोक्त संदर्भ २ नुसार राज्यस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली होती. सदरहू समितीच्या शिफारशी संदर्भ ३ मधील पत्रान्वये संचालनालयाने सादर केल्या होत्या व तद्नुषंगाने या शिफारशी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आल्या होत्या. सदर शासन निर्णयासोबत जोडलेल्या प्रपत्रात प्रत्येक संस्थासमोर नमूद केलेल्या पत्रान्वये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने कळविल्यानुसार राज्यातील पदविका स्तरावरील संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्या प्रमाणे सुधारित प्रवेशक्षमता बदल, नवीन अभ्यासक्रम सुरु

Principal
Navsanjivan Shikshan Mandal,
College of Pharmacy
Darwha Dist: Yavatmal

अधिव्याख्याता विद्युत अभियांत्रिकी
शासकीय तंत्रनिकेतन, यवतमाळ

करण्यास व सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमांना मुदतवाढ देण्यास शैक्षणिक वर्ष २००५-०६ पासून पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून शासन मान्यता देत आहे.

उपरोक्त संदर्भ - १ मधील शासन निर्णयान्वये विना अनुदानित तंत्रशिक्षण संस्थांना परवानगी देण्यासाठी शासनाने विहीत केलेल्या अटी व शर्ती प्रपत्र-ब मधिल संस्थांवर बंधनकारक असतील. शासनाने विहीत केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून यापुढे विहीत करण्यात येणाऱ्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संबंधित संस्थेस करारनामा करावा लागेल.

संबंधित संस्थेसमोर नमूद केलेल्या अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या पत्रात व त्या पत्रासोबतच्या प्रपत्रामध्ये नमूद करण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून सदर मान्यता देण्यात येत आहे.

सदर पदविका अभ्यासक्रमासाठी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाची संलग्नता आवश्यक राहील. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या उपरोक्त संदर्भ-५ व ६ मधिल पत्रान्वये मंडळाने ज्या संस्थांची शिफारस शासनास केली नसेल त्या संस्थांनी विहीत पध्दतीनुसार तंत्रशिक्षण मंडळाकडे अर्ज करुन संलग्नतेची आवश्यक कार्यवाही पूर्ण करावी.

सदर शासन निर्णयासोबत जोडलेल्या प्रपत्र अ मधील शासकीय व अनुदानित संस्थांतील प्रवेशक्षमतेतील वाढीसाठी आवश्यक पदनिर्मिती व आर्थिक तरतूद झाल्याशिवाय या संस्थांत वाढीव प्रवेशक्षमतेचे प्रवेश देण्यात येऊ नये.

शासन निर्णयाच्या प्रपत्र-क मधील संस्थांसमोर नमूद केलेल्या अभ्यासक्रमासाठी या वर्षापासून प्रथम वर्षाची प्रवेशप्रक्रिया राबविण्यात येऊ नये.

सदर शासन निर्णयाच्या प्रपत्र- ड मधील संस्थांत या वर्षापासून प्रवेशप्रक्रिया बंद करण्यास परवानगी देणेत आली आहे. परंतु जोपर्यंत संस्था बंद करण्याबाबत उपरोक्त संदर्भ-४ मधील अधिनियमानुसार आवश्यक कार्यवाही पूर्ण होत नाही तोपर्यंत या संस्था बंद करता येणार नाही.

प्रवरा रुरल एज्युकेशन सोसायटीचे प्रवरा रुरल वुमेन्स पॉलिटेक्निक, लोणी, ता.राहता, जि.अहमदनगर या तंत्रनिकेतनाचे प्रवरा रुरल एज्युकेशन सोसायटीचे पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील तंत्रनिकेतन, लोणी ता.राहता, जि.अहमदनगर या तंत्रनिकेतनात एकत्रिकरण करण्यास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे पत्र क्र.एफ ...-९४(ड)/आरसी/९४/११८/टीएमडीई-२००५ दि.३० जून, २००५ मधील नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून शासन मान्यता देत आहे.

या शासन निर्णयाच्या प्रपत्र- अ, ब, क व ड मधिल नवीन अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेतील बदल लागू करुन या संस्थांना यावर्षी पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेत सामावून घेण्याची कार्यवाही संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी करावी व तदनुषंगाने संस्थांची अद्ययावत यादी तयार करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सु.बा.तुंबारे

(सु.बा.तुंबारे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प.क्र. विकास/शिक्षण/२००५/ ५४६

सहसंचालक तंत्र शिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती

दिनांक: ३१.८.०५

प्रति,

अध्यक्ष / प्राचार्य,

जवसंजिवनी शिक्षण संस्थाचे

कॉलेज ऑफ फार्मसी

दारव्हा

यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.

सहसंचालक, तंत्र शिक्षण,

विभागीय कार्यालय, अमरावती.

अशासकीय विना अनुदानित संस्थेतील नविन अभ्यासक्रम/प्रवेश क्षमता वाढ/मुदतवाढ - सन २००५-०६

| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 25 | Navsanjivani Shikshan Mandal, Ambika Nagar, Darwha, Dist. Yavatmal | Navsanjivani Shikshan Mandal's college of Pharmacy, Darwha, Ambika Nagar Dist. Yavatmal- 445 202. | D. Pharm | 40 | 60 | 3 YRS | 10+2 | 2005-2006 | F 740-89-71/(P)/ ET/96/58/TMDE-1611 dated 30th June,2005 |
| 26 | Head Quarters, Western Naval Command, INS Angre, SBS Road, Mumbai – 400 001 | Naval Institute of Hotel Management and Catering Technology, 4th Pasta Lane Colaba, Mumbai 400 005 | Diploma in HMCT | 45 | 60 | 3 YRS | 10+2 | 2005-2006 | F 740-89-003/(H)/ ET/99/8/TMDE-1824 dated 30th June,2005 |

सु. म. तुमरे

अधिव्याख्याता [illegible] अभियांत्रिकी
शासकीय तंत्रनिकेतन, यवतमाळ